**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

क्र. : मुमाआ-२०२४/नों. क्र.१३/त. क्र.१२६/२४/०१

प्रति,
श्री. फारुकी रिजवान जब्बार
गुलशन नगर, बालेपीर नगर रोड,
ता.जि.बीड-४३११२२

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक
मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्या.
मुंबई डी.डी.बिल्डींग, २ रा मजला, जुने जकात घर,
शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ०२३.

| | | |
|---|---|---|
| तक्रारीचा दिनांक | : | ०१-०१-२०२४ |
| सुनावणीचा दिनांक | : | २५-०४-२०२४ |
| तक्रारदार | : | उपस्थित (ऑनलाईन) |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्र. मुमाआ/नो.क्र.५३२१/१९/अ.क्र.९६७/२२ मध्ये फारुकी रिजवान जब्बार यांच्या शैक्षणिक कर्ज प्रस्तावाना बाबत Shree J. J. T. University राजस्थान या University ने दि. १०.१२.२०१८ ते दि. २०.०१.२०१९ पर्यंत आपणांस दिलेल्या Ph.d शिक्षणाच्या verification बाबतच्या पत्रासह सर्व पत्रव्यवहार व त्याला आपल्या महामंडळाकडून देण्यात आलेल्या सर्व उत्तरांची प्रमाणित प्रत कोर्ट कामासाठी देण्यात यावी यावाबत सविस्तर माहिती/कागदपत्रांची माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि. २२-०८-२०२२ रोजीच्या आदेशान्वये अपिलकर्तांना संपूर्ण माहिती मिळाली म्हणून अपिल निकाली काढले.

तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.०१-०१-२०२४ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार दृकश्राव्य (ऑनलाईन) उपस्थित. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वसूली अधिकारी श्री.हसन जमादार. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र.उपव्यवस्थापक श्री.शेख शकील शेख शौकत उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी तक्रारदारांनी सूचित केले की, आयोगाचे द्वितीय अपील सुनावणीच्या वेळी ३३२ पृष्ठे अपिलकर्तांना दिले त्या आधारावर आयोगाने अपील निकाली काढले. त्यांना जी माहिती मिळाली ती त्यांना हव्या असलेल्या माहितीशी संबंधित नव्हती. जन माहिती अधिकारींनी आयोगाकडे चुकीची माहिती दिली होती.

सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## अंतरिम आदेश

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक यांनी या आदेश प्राप्तीच्या १५ दिवसात केलेल्या कार्यवाहीबद्दल पुरावा सादर करावा. जर पुरावा सादर केला नाही तर त्यांनी आदेशाची अंमलबजावणी केली नाही हे गृहित धरुन पुढील कारवाई करतील.

२. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी द्वितीय अपिल सुनावणीच्या वेळी ज्या ३३५ पानांबददल सूचना दिली होती त्या प्रकरणी माहिती अर्ज संबंधित होते किंवा कसे याबद्दल विचारलेली माहिती व अभिलेखची नोंद शपथपत्रावरुन १५ दिवसात आयोगाकडे सादर करावी.

मुंबई
दिनांक : २५-०४-२०२४

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

State Information Commission
Maharashtra